RNI No. MAHBIL /2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - २५] बुधवार, सप्टेंबर २९, २०२१ / आश्विन ७, शके १९४३ [पृष्ठ १

असाधारण क्रमांक २५

प्राधिकृत प्रकाशन

विभागीय आयुक्त यांजकडून

पुणे विभाग, पुणे

नमुना एक - क

(नियम १३ पहा)

निवडणुकीची नोटिस

क्रमांक मनपा/नपाप्र-१/कावि-८८१/२०२१.---

(१) याद्वारे नोटिस देण्यात येते की, पुणे महानगर क्षेत्र या ग्रामीण/मोठे नगर/लहान नगर मतदारसंघातून महानगर नियोजन समितीच्या सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणूक घ्यावयाची आहे.

(२) उमेदवार किंवा त्याचा सूचक यांनी नामनिर्देशनपत्र निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांना जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ पूर्वी कोणत्याही दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त इतर दिवशी) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत सादर करावेत.

(३) नामनिर्देशनपत्राचा नमुना उपरोल्लिखित ठिकाणी व वेळी मिळतील.

(४) नामनिर्देशनपत्रांची छाननी दिनांक १८ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे सुरू होईल.

(५) उमेदवार/सूचक किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी (उमेदवारांनी ज्याला उमेदवारी मागे घेण्यासाठी लिखित स्वरूपात प्राधिकृत केले असेल) यांनी उमेदवारी मागे घेण्याची नोटिस उपरोक्त परिच्छेद क्रमांक (२) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात दिनांक २५ ऑक्टोबर २०२१ रोजी दुपारी ३.०० पूर्वी सादर करावी.

(६) निवडणूक घेण्यात आल्यास मतदान दिनांक १० नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजता या दरम्यान घेण्यात येईल.

सौरभ राव,
विभागीय आयुक्त
पुणे विभाग, पुणे.

पुणे, २९ सप्टेंबर २०२१.

एच-२२९, भाग एक-अ (असा.) पु.वि.पु.—२५

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.